# भारतातील रोजगार स्थिती आणि कोविड–१९

**डॉ. वासंती निचकवडे**
Associate Professor
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख,**
**श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय,**
**महाल, नागपूर**
Email – vasantinichkawade@gmail.com

---

**प्रस्तावना :** भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून आजही कृषी व कृषी संबंधित रोजगारात जवळपास ६० टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे दिसते. भारत खेड्या खेड्यांमध्ये वसलेला देश आहे. भारतीय कृषीचे स्वरूप हे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडीत रोजगार बाराही महिने उपलब्ध नसतो. म्हणून पोटापाण्यासाठी असंख्य ग्रामीण तरुण कामाच्या शोधात ग्रामीण भागातून शहराकडे येतात. व शेतीचा हंगाम सुरू झाला की पुनश्च शेतीकडे रोजगार मिळविण्यासाठी ग्रामीण भागात परत जातात. हंगामापूर्वी हंगामानंतर रोजगारासाठी ग्रामीण लोकांची तळ्यात व मळ्यात अशी स्थिती निर्माण होते. संपूर्ण व कायम रोजगार मिळविले आजही ही अर्थव्यवस्थेसाठी यक्षप्रश्न आहे.

**१९९१ नंतर रोजगाराची स्थिती :** १९९१ नंतर देशात जागतिकीकरणाच्या नीतीचा अवलंब केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील बेरोजगारी कमी करण्याच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश आले. परंतु देशातील वाढती लोकसंख्या व त्यातील कार्यकारी लोकसंख्येला रोजगार उपलब्ध होण्यास मदत मिळाली. याचा परिणाम आर्थिक वृद्धि दराची गती वाढली. सद्यस्थितीत जगात भारतीय अर्थव्यवस्था २.७ ट्रीलियन सह पाचव्या स्थानावर पोहोचली असली तरी, अचानक उद्भवलेल्या चिन मधून निर्माण झालेला कोरोनाविषाणू संपूर्ण विश्वाला कवेत घेत विषाणू संसर्गाचे थैमान घातले व त्या अनुषंगाने लावलेल्या संचारबंदी मुळे जगाच्याअर्थव्यवस्थेला बेरोजगारीच्या विळख्यात अडकवलं. भारतासारख्या विकसनशील देशात या जागतिक महामारी मुळे बेरोजगारी, स्थलांतर, उपासमार, दारिद्र्य अशा एक ना अनेक एक समस्या निर्माण झाल्या. व त्या समस्यांनी उग्र रूप धारण केले. भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील अनेक आव्हाने आहेत त्यातून अर्थव्यवस्थेला सहीसलामत बाहेर काढणे व पूर्वपदावर अर्थव्यवस्था आणणे मोठे जिकरीचे काम आहे. त्यासाठी सरकार द्वारे प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात असून अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून, आत्मनिर्भर भारत, सुक्ष्म लघु व मध्यम उद्योगांचा विकास, नवीन कृषी धोरण, नवीन शैक्षणिक धोरण यांचा समावेश आहे. नवीन कृषी धोरणातून भारतीय कृषी व्यवसाय आत्मनिर्भर करणे हा प्रमुख उद्देश आहे. ज्यामुळे कृषी मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, कृषी मालाला किंमत मिळवून देणे हे उद्दिष्ट आहे. कारण भारतीय कृषी आजही मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यास सक्षम आहे.

**रोजगार व Covid–१९ :** कोरोना विषाणूचा प्रसाराने जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासात बाधा निर्माण झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात बोलायचे झाल्यास कोरोना महामारी मुळे जागतिक आरोग्य संकटा सोबत बेरोजगारीचे महासंकट

निर्माण झाले आहे. कोणाचा प्रभाव व प्रादुर्भाव कमी करण्यासाठी संपूर्ण अर्थव्यवस्था व घोषित काळासाठी संचारबंदी लागू करण्याचा निर्णय केंद्र व राज्य सरकारला घेणे आवश्यक होते. या संपूर्ण संचारबंदी मुळे अर्थव्यवस्थेतील कामगारांच्या हाताचे काम संपले. त्यांच्यावर बेरोजगारीमुळे उपासमारीची वेळ आली. साठवलेले पैसे होते तोपर्यंत जगणं थोडं तरी शक्य होते. मात्र संचारबंदी चा कालावधी जसजसा वाढत गेला तसा कामगारांचा उद्रेकही वाढला. कोणत्याही प्रकारचे प्रवासाचे साधन उपलब्ध नव्हते. मिळेल त्या वाहनाने जीव धोक्यात टाकून मूळ गावी परतण्याचा निर्धार कामगारांचा पक्का होत होता. बरेच मजूर आपल्या चिल्यापिल्यांच्या सह पायदळी प्रवास करू लागले. एवढे मोठे संकट या जागतिक महामारी मुळे उद्भवले.

कोविड १९ पूर्वीची रोजगाराची स्थिती—अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीच्या स्थितीचा कोविड १९ पूर्व व पश्चात अशा दोन विभागात विभागणी केली तर भारतामध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण ३० जानेवारी २०२० रोजी आढळून आला असला तरी संपूर्ण भारतामध्ये संचारबंदी लागू करण्यासाठी २५ मार्च २०२० हा दिवस उगवला. याचा अर्थ कोरोनाविषाणू विषयी आम्ही अज्ञानी नव्हतो पण जणू काही या विषाणूचा आणि आमचा विशेष संबंध नाही आणि भारतात त्याचे आगमनच होणार नाही अशा अविर्भावात सामान्य जनजीवन शांतपणे सुरू होते. या विषाणूचा प्रभाव वाढल्यास काय नियोजन करता येईल यासाठी मात्र सरकार उच्च स्तरावर नियोजन तसेच नियंत्रणासाठी कार्यरत होते. अखेर संचारबंदी लागू झाली. त्यावेळी भारतात आर्थिक वर्ष संपण्यासाठी केवळ एक आठवडा म्हणजेच सात दिवस बाकी होते. यावरून आपण असे म्हणू शकतो की,२०१९—२० या आर्थिक वर्षावर कोरोना संसर्गाचा प्रभाव नव्हता. म्हणून देशाच्या आर्थिक वृद्धी दराचा विचार केल्यास २०१७—१८ मध्ये ७.२, २०१८—१९ मध्ये ६.८ आणि २०१९—२० मध्ये तो ४.२ राहिला यावरून असे निदर्शनास येते की सलग तीन वर्षांचा विचार केल्यास वृद्धी दर सातत्याने घटत असताना दिसतो. त्याच वेळी बेरोजगारीचा दर अनुक्रमे २०१७—१८ मध्ये ७.१, २०१८—१९ मध्ये ५.८ व २०१९—२० मध्ये ७.६ होता अर्थात बेरोजगारीचा दर वाढता आहे हे लक्षात येते. सद्यस्थितीचा विचार केल्यास जेव्हा कोरोनची सुरुवात झाली व संचार बंदीचा आदेश आल्यानंतर २०२० जानेवारी ते मार्च या कालावधीतील वृद्धीदर ३.१ राहिला म्हणजेच आर्थिक वृद्धी दरात क्रमशा हा घट होणे व बेरोजगारीत वाढ होताना दिसते.अर्थात वृद्धीदर कमी होणे म्हणजेच देशांतर्गत वस्तू व सेवा यांचे उत्पादन घटत असताना रोजगार कमी कमी होत जाणे हा त्याचाच परिणाम आहे. यासाठी अमेरिका व चीन यांच्यातील व्यापार युद्ध हे कारण दिसत असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत व्यवस्थाही कारणीभूत आहे असे म्हणावे लागेल. याबाबत सीएमआई, एनएसएसओ, मे २०१९ चा पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे यांच्या ते भारतात२०१८ या आर्थिक वर्षात १ कोटी१० लाख लोकांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या असून मागील पाच वर्षातील स्थितीचा आढावा घेतल्यास ४ कोटी ७० लाख रोजगार संपुष्टात आल्याचेही निदर्शनास येते. इतकेच नव्हे तर भारतातील १३५ करोड लोकसंख्येपैकी फक्त ४० करोड लोक अर्थव्यवस्थेत कार्यरत होते. या सर्वे मध्ये पुढे असे म्हटले आहे की, २५वर्ष वयोगटातील तरुण पिढीतील ५० तरुण नोकरीच्या शोधार्थ होते. २०१७—१८ मध्ये १५—१९ या वयोगटातील १९.२ तरुण बेरोजगार असल्याचे दिसून येते. एप्रिल २०१९ च्या सी एम आई च्या आकडेवारीवरून बेरोजगारीचा दर ८.१ इतका वाढलेला दिसतो. अर्थात हे मागील पंचेचाळीस वर्षातील संपूर्ण बेरोजगारीचे चित्र विदारक, भयावह, व चिंताजनक आहे

**कोविड पश्चात रोजगार स्थिती व उपाय योजना :** भारतातील बेरोजगारीची कारणे वेगवेगळी आहेत. ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढते त्या तुलनेने रोजगार संधीची उपलब्धता नसणे, ज्या ठिकाणी रोजगार संधी उपलब्ध होतात त्यासाठी

गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाचा अभाव असणे, कृषी क्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष अशी पारंपारिक कारणे आहेत. कोविड–१९ पूर्वी भारतात रोजगारीचे चित्र चिंताजनक होते त्यात कोरोना विषाणूने भर घातली. दिनांक २५ मार्च नंतर संपूर्ण देशात संचारबंदी लागू झाल्यानंतर निर्यात, गुंतवणूक ठप्प झाल्यामुळे भविष्यात आर्थिक वृद्धी दूर होणार असल्याचे स्पष्ट संकेत दिसत होते. रोजगार स्थितीचा विचार केल्यास वर्ष २०२० च्या सुरुवातीच्या तीन महिन्यातील बेरोजगारीचा दर देखील उच्च पातळीवर होता. एप्रिल २०२० मध्ये २३.५२, मे २०२० मध्ये २३.४८ तर जून २०२० मध्ये११ झाला कोरोनाच्या काळात जग बदलले आहे. कोरोनाचे संकट दूर झाल्यानंतर जगात आणखी मोठे बदल झालेले असतील.या अनुषंगाने दिनांक ७ नोव्हेंबर रोजी आयआयटी दिल्लीतील विद्यार्थ्यांना संबोधित करताना माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आयटी दिल्लीच्या ५१ व्या दीक्षांत समारंभाला आभासी माध्यमातून संबोधित करताना म्हणतात, कोरोना नंतरचे जग बरेच वेगळे राहणार आहे आणि या तंत्रज्ञान क्षेत्रात फार मोठी भूमिका पार पाडावी लागणार आहे. कोरोना ने जगाला खूप मोठी शिकवण दिली आणि ती म्हणजे जागतिकीकरणाचे महत्व आहेच पण त्याहीपेक्षा आत्मनिर्भर होणे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले यानंतर ते म्हणतात की सरकार युवकांना व्यावसायिक सुलभता देण्यासाठी वचनबद्ध आहे. त्याचा लाभ घेऊन नाविन्यपूर्ण कार्य करण्याचे आवाहन केले. तुमची बुद्धिमत्ता आणि अनुभव यांचा एकत्रित कार्य करून गरिबांच्या आयुष्यातही बदल करण्यासाठी व त्यांचे जीवन सुलभ करण्यासाठीचा सल्ला दिला. तंत्रज्ञानामुळे किती परिवर्तन होते याचा अनुभव सध्या देश त्याचबरोबर संपूर्ण देशवासी ही याचा अनुभव घेत आहे.तेव्हा तुम्ही विद्यार्थी देखील गुणवत्तेवर भर देऊन व त्याच्याशी कुठलीही तडजोड न करता, तुमचे कार्य तुमच्या पुरते मर्यादित न ठेवता ज्या सुविधा तुम्हाला प्रदान केल्या जातात त्याचा उपयोग गरिबातल्या गरीब व्यक्तीचे आयुष्य सुलभ होईल याकरिता कार्य करण्याचे आवाहन प्रधानमंत्री यांनी केले. कारण या सर्वांचा एकत्रित परिणाम थेट देशाच्या विकासावर आणि सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यावर पडणार आहे. म्हणून हे कोरोनाचे संकट तुमच्यासाठी मोठी संधी घेऊन आले आहे. असा सल्ला आय आय टी च्या ५१ व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना दिला. यावरून भारत इतर देशातील आयातीवर अवलंबून न राहता देश आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्नरत असण्याचे सांगितले यावरून देशामध्ये व्यवसायात वाढ करणे व त्यातून लोकांना रोजगार देणे हे अपेक्षित आहे. ज्यातून बेरोजगारी काही प्रमाणात कमी होईल. अर्थात भारतातील बेरोजगारीची पारंपारिक कारणे आणि कोरोना विषाणू नंतरची स्थिती यांचा आढावा घेतल्यानंतर यावर काही उपाय योजना खालील प्रमाणे सांगता येतील.

**उपाय योजना :**

- कृषी आधारित उद्योगांचा विकास करणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करणे
- स्थानिक रोजगारात वाढ करणे.
- कामगार प्रधान उद्योगांना उत्तेजन देणे
- स्वयंरोजगार प्रोत्साहन देणे
- लघु मध्यम उद्योगांचा विकास करणे
- लोकांना आर्थिक संरक्षण देणे
- शिक्षण प्रणालीत बदल करणे

- आत्मनिर्भर भारत यशस्वी अंमलबजावणी करणे

उपरोक्त उपाययोजना रोजगार निर्मितीसाठी चालना देणाऱ्या ठरवू शकतात. कारण भारतात आजही जवळपास ५० ते ५५ लोक शेती व्यवसायाशी निगडित व्यवसायात सामावलेले आहेत. ग्रामीण भागात कृषी आधारित उद्योगांचा विकास व वाढते शहरीकरण थांबविण्यासाठी मदत करू शकतात. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगार संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. देशामध्ये ज्या मोठमोठ्या शैक्षणिक संस्था आहेत त्या संस्थांमधून शिकून विद्यार्थ्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी कोरोना संकट ही उपलब्धी ठरू शकेल.

**निष्कर्ष :** भारताची अर्थव्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण असून यात संघटित, असंघटित, कृषी, बिगर कृषी, कुशल–अकुशल अशा सर्वच घटकांचा एकाच वेळी समावेश होतो. आणि सर्व घटकांचा विकास करण्यासाठी समग्र दृष्टिकोनाची गरज आहे. तर दुसरीकडे अकुशल कामगारांना प्रशिक्षण देऊन कुशल करून असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटित क्षेत्रात समाविष्ट करून घेणे आवश्यक आहे. आजही कृषी क्षेत्रातून सर्वात अधिक रोजगार निर्मिती होते. सरकारद्वारा राबविण्यात येत असलेल्या रोजगाराच्या विविध योजना व धोरणे यामुळे रोजगार निर्मिती होत असते. उदाहरणार्थ पंतप्रधान ग्रामसडक योजना, स्मार्ट सिटी, हुन्नर से रोजगार तक इत्यादी. आधुनिक अर्थव्यवस्थेचे यशापयश हे मुख्यत: रोजगार निर्मितीवर अवलंबून असल्यामुळे ज्याला काम करण्याची इच्छा आहे त्या प्रत्येक हाताला काम देणे हे चांगल्या अर्थव्यवस्थेत मानले जाते. आत्मनिर्भर भारत अंतर्गत भविष्यकाळात सरकारच्या रोजगार योजनांची अंमलबजावणी होऊन रोजगार निर्मिती होईल असे आशादायी चित्र असायला हवे.

**संदर्भ ग्रंथ :**


- India year Book 2019
- NSSO रिपोर्ट
- आर्थिक सर्वेक्षण २०१९–२०
- भारतीय अर्थव्यवस्था– सुधाकर शास्त्री
- दैनिक वर्तमानपत्रे– महाराष्ट्र टाइम्स ,लोकसत्ता इ.